स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
२१ वर्ष
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● बुधवार, दिनांक ४ मार्च २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ५६ ● पाने : ४ | http://epaper.beedvastav.com | Email : beedvatsav@gmail.com | ● किंमत ३ रुपये

# प्रीतम मुंडे पुन्हा खासदार होणार?
# मंत्री पंकजा मुंडे यांचे मोठे वक्तव्य

**राज्यसभेच्या जवळपास 37 जागा रिक्त होत असून यापैकी 7 जागा महाराष्ट्रातील आहेत. या सात जागांच्या अनुषंगाने घडामोडींना वेग!!**

**या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह भाजपाचे आदी दिग्गज नेत्यांची उपस्थिती**

**प्रीतम मुंडे यांच्या नावाबरोबरच आणखी काही नावं चर्चेत! त्यामुळे बाकी निर्णय पक्षाचे सर्व नेते घेतील : ना. पंकजा मुंडे**

## विनोद तावडे, रामदास आठवले, माया चिंतामन ईवनाते, रामराव वडकुते यांचीही नावे जाहीर







**भाजपकडून 'सोशल इंजिनिअरिंग' राज्यसभेसाठी विनोद तावडे, आठवलेंसह दोन नव्या चेहऱ्यांना संधी**

**मुंबई : प्रतिनिधी**
**राज्यसभेच्या जवळपास 37 जागा रिक्त होत आहेत. यापैकी 7 जागा महाराष्ट्रातील आहेत. राज्यसभेच्या महाराष्ट्रातील सात जागांच्या अनुषंगाने आता घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नावावर चर्चा करण्यासाठी मंगळवारी मुंबईत भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह भाजपाचे आदी दिग्गज नेते उपस्थित होते. यावेळी भाजपाकडून राज्यसभेसाठी नावं निश्चित झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दरम्यान, या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बोलताना भाजपा नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. 'राज्यसभेसाठी प्रीतम मुंडेंचं नाव चर्चेत असून बाकी निर्णय पक्षाचे नेते घेतील', असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे.**

### पंकजा मुंडे काय म्हणाल्या?

● राज्यसभेसाठी अनेक नावे चर्चेत आहेत. त्या नावांपैकी एक नाव प्रीतम मुंडे यांचं देखील आहे. कारण त्या देखील या आधी खासदार होत्या. पण यावेळी पक्षाच्या आदेशानुसार मी (पंकजा मुंडे) लोकसभा लढवली होती. त्यानंतर प्रीतम मुंडे यांनी पक्षाचं काम केलं, तसेच त्यांनी खासदार म्हणून देखील काम केलेलं आहे. आता प्रीतम मुंडे यांच्या नावाबरोबरच आणखी काही नावं देखील चर्चेत आहेत. त्यामुळे आता बाकी निर्णय आमच्या पक्षाचे सर्व नेते घेतील अशी आमची अपेक्षा आहे", असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे.

### भाजपाच्या बैठकीत काय चर्चा झाली?

● या बैठकीत विनोद तावडे, रामदास आठवले, रावसाहेब दानवे, प्रीतम मुंडे, विजया रहाटकर आणि भागवत कराड यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांच्या नावांवर चर्चा झाली. बैठकीत काही इतर नावांचाही विचार करण्यात आला. सूत्रांचे म्हणणे आहे की, पर्याय निवडताना पक्ष अनुभव, निष्ठा आणि प्रादेशिक प्रतिनिधित्वाचा विचार करत आहे. बैठकीला उपस्थित असलेल्या नेत्यांनी आपली मते मांडल्याचे समजते.

**महाविकास आघाडीची कोंडी?** ● दुसरीकडे, महाविकास आघाडीकडे असलेल्या संख्याबळानुसार त्यांची केवळ एक जागा निवडून येऊ शकते. मात्र, या जागेवर शरद पवार गट, काँग्रेस की उबाठा गट आपला उमेदवार देणार, याबाबत अद्याप एकमत झालेले नाही. दरम्यान, भाजपने आपल्या उमेदवारांच्या माध्यमातून मराठा, दलित, आदिवासी आणि धनगर अशा सर्वच समाजघटकांना सामावून घेण्याचा प्रयत्न केल्याने, ही निवडणूक केवळ औपचारिकता उरते की काही वेगळे वळण घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### राज्य पातळीवर कोणताही अंतिम निर्णय अद्याप नाही!!

● राज्य पातळीवर कोणताही अंतिम निर्णय झाला नसला तरी सुचविलेल्या नावांची एक यादी तयार करण्यात आली आहे. ही यादी आता दिल्लीतील भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली जाईल. शिफारसींवर चर्चा करण्यासाठी रविंद्र चव्हाण लवकरच राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची भेट घेण्याची शक्यता आहे. अंतर्गत चर्चेनंतर केंद्रीय नेतृत्वच अंतिम निर्णय घेईल, असे सांगण्यात आले आहे.

### महाराष्ट्रातून कोणाच्या नावांची चर्चा?

● राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली होती. महाराष्ट्रातील सर्वाधिक म्हणजेच सात जागा रिक्त होणार आहेत. त्यानुसार भाजपाकडून महाराष्ट्रातील जागांसाठी आपले चार उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. भाजपाचे सरचिटणीस आणि बिहारचे प्रभारी विनोद तावडे यांचे नाव राज्यसभा निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आले आहे. २०१९ नंतर संसदीय राजकारणापासून दूर असलेले विनोद तावडे यांचे यानिमित्ताने पुनरागमन होत आहे. विनोद तावडे यांच्यासह भाजपाने आरपीआय (आठवले) गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, श्रीमती माया चिंतामन ईवनाते आणि रामराव वडकुते यांचीही नावे राज्यसभा निवडणुकीसाठी जाहीर केली आहेत. १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी ५ मार्च पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत आहे. भाजपाने देशभरात उमेदवारी जाहीर करताना संघटनात्मक प्रभाव असलेल्या नेत्यांना प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे.

## इराण-इस्रायल युद्धात मुंबईकर तरुणाचा मृत्यू, २५ वर्षीय दीक्षितचा ड्रोनने घेतला बळी

➤ मुंबई : प्रतिनिधी

मध्य-पूर्वेतील महायुद्ध सुरु होऊन ५ दिवस झाले असून याची झळ आता भारतालाही बसली आहे. या युद्धात भारताच्या २५ वर्षीय दीक्षितचा ड्रोनने बळी घेतला आहे. ओमानच्या किनारपट्टीवर मस्कतजवळ एका मालवाहू ऑईल टँकरवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात मुंबईतील कांदिवली परिसरात राहणाऱ्या दीक्षित सोलंकी याचा मृत्यू झाला आहे.

मूळचा दीवचा असलेला २५ वर्षीय दीक्षित सोलंकी काही काळापूर्वी व्यवसायानिमित्त मुंबईत स्थायिक झाला होता. तो मुंबईतील कांदिवली भागात वास्तव्यास होता. ओमानच्या मस्कत किनारपट्टीपासून ५२ नॉटिकल मैलांवर 'MKD Vyom' या ऑईल टँकरवर स्फोटकांनी भरलेल्या ड्रोन बोटीने धडक दिली. या भीषण स्फोटात टँकरच्या इंजिन रूमला आग



लागली आणि त्यात दीक्षितचा जागीच मृत्यू झाला.

दीक्षित हा दीवमधील मच्छीमार व्यावसायिक अमृतलाल सो25-year-oldलंकी यांचा धाकटा मुलगा होता. महिनाभरापूर्वीच आईच्या निधनानंतर तो गावी आला होता आणि पुन्हा कर्तव्यावर परतला होता, मात्र काळाने त्याच्यावर झडप घातली.

ओमानमधील भारतीय दूतावासाने दीक्षित सोलंकीच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे.

टँकरवरील इतर २५ क्रू मेंबर्सची (ज्यात १६ भारतीय होते) सुखरूप सुटका करण्यात आली आहे.

## दौलावडगाव येथील आगप्रकरणी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा मदतीचा हात!

### आरोपींच्या अटकेसाठी आंदोलनाचा इशारा

➤ माजलगाव / प्रतिनिधी :

दौलावडगाव (ता. आष्टी, जि. बीड) येथे गाडे महाराज यांना किरकोळ कारणावरून मारहाण करण्यात आल्यानंतर, ते बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या घराला मध्यरात्री आग लावल्याची गंभीर घटना घडली. या आगीत घरातील अन्नधान्य, कपडे, दागिने तसेच सर्व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. या घटनेत अंदाजे २० ते २५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. सध्या गाडे महाराज यांचे कुटुंब उघड्यावर आले आहे.

या घटनेची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप तसेच प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड

**जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्याकडून आर्थिक मदत**




यांना मिळाली. त्यानंतर जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांना गाडे महाराज यांची भेट घेऊन मदत करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

त्याअनुसार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना आवाहन करण्यात आले. जमा झालेली ३०/ हजार रुपयांची रक्कम ३ मार्च २०२६ रोजी गाडे महाराज यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्त करण्यात आली. या वेळी कुटुंबीयांना धीर देत पुढील मदतीचे आश्वासन देण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणात संबंधित आरोपींवर गुन्हे दाखल झाले असले तरी अद्याप त्यांना अटक झालेली नाही. अंभोरा पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षकांची भेट न झाल्याने उपस्थित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. चार दिवसांच्या आत अटक न झाल्यास राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने ● पान ४ वर...

## समतेसाठी झगडणारे निर्भीड लेखणीचे योद्धा डॉ. रणजीत मेश्राम काळाच्या पडद्याआड : प्रवीण बागडे



➤ **नागपूर :** नागपूर येथील प्रखर, निर्भीड आणि तत्त्वनिष्ठ पत्रकार तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रणजीत मेश्राम यांच्या आकस्मिक निधनाने शहरासह सामाजिक, साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने समाजाचे मोठे आणि अपूरणीय नुकसान झाले असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या प्रवासात नेहमीच सत्य, न्याय आणि समाजहिताच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. सत्तेच्या दबावाला वा कोणत्याही प्रलोभनाला न जुमानता त्यांनी निर्भीडपणे भूमिका मांडली. वंचित, शोषित आणि गरजू घटकांचा आवाज बनून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या लेखणीने अन्यायाविरुद्ध लढा दिला आणि जनतेच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

निशब्द करणारी ही दु:खद घटना, आदरांजली वाहण्याचंही धाडस होत नाही. समतेसाठी धगधगणारं वादळ आज शांत झालं. समाजाने आज एक सच्चा मानवतावादी, चळवळीचा निष्ठावान सिपाही गमावला. अत्यंत अभ्यासू विचारवंत, परखड वक्ते आणि क्रांतिकारी लेखणीचे धनी असलेले डॉ. रणजीत मेश्राम यांनी आयुष्यभर आपली लेखणी व्यवस्थेतील विसंगतींविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आणि सत्याच्या बाजूने निडरपणे चालवली. त्यांच्या विचारांत धार होती, शब्दांत ज्वाला होती आणि भूमिका नेहमीच ठाम व तत्त्वनिष्ठ असायची. त्यांनी पत्रकारिता केवळ व्यवसाय म्हणून नाही, तर सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी ● पान ३ वर...



# जागर महामानवांच्या विचारांचा : संयुक्त जयंतीनिमित्त प्रेरणादायी व्याख्यान संपन्न!

**माजलगाव : प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज, संत रविदास, संत सेवालाल महाराज, संत गाडगेबाबा, रमाबाई आंबेडकर ( माता रमाई ) व भीमाबाई रामजी आंबेडकर ( माता भिमाई ) यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त "जागर महामानवांच्या विचारांचा" या विषयावर व्यंकटेश हॉल येथे प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले . व्याख्याते धर्मराज करपे यांचे सविस्तर व अभ्यासपूर्ण व्याख्यान उत्साहात पार पडले . कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली . प्रास्ताविकात भरतभाऊ टाकणखार यांनी कार्यक्रमामागील उद्दिष्ट स्पष्ट करताना, जयंती उत्सव केवळ औपचारिक न राहता त्यांच्या विचारांचे समाजमनात रोपण व्हावे व कर्मचारी तसेच सर्वसामान्य जनतेमध्ये सामाजिक जाणीव दृढ व्हावी, हा मुख्य हेतू असल्याचे नमूद केले .

प्रमुख व्याख्याते धर्मराज करपे यांनी आपल्या ओजस्वी भाषणात रयतेचे राज्य, संतांची समता आणि मातृत्वाचा त्याग हा समाजपरिवर्तनाचा खरा मार्ग असल्याचे प्रतिपादन केले . छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सुशासन, स्वाभिमान आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श त्यांनी मांडला . संत रविदास यांनी दिलेला समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले . तसेच संत सेवालाल महाराज यांच्या समाजसंघटन व नैतिकतेवरील कार्याचा विशेष उल्लेख केला .

संत गाडगेबाबा यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि शिक्षण प्रसारासाठी केलेल्या कार्याचा संदर्भ देत, कृतीप्रधान विचारांची आवश्यकता त्यांनी मांडली . माता रमाई व माता भिमाई यांच्या त्याग, संघर्ष व संस्कारांनी घडवलेली सामाजिक चेतना प्रत्येक कुटुंबासाठी आदर्श असल्याचे त्यांनी सांगितले . यावेळी बद्रीनाथ करपे, अशोक लांडगे, सखाराम जोशी, वरूनराज तौर, अमर साळवे, आनंद सिरसट, नामदेव पाचपुते, नामदेव कोकाटे, प्रभाकर साळवे, बाळासाहेब सोनसळे, अशोक राठोड, साहेबराव राठोड, प्रा . संजय बागुल, भगवान डोंगरे, विकास टाकणखार, दीपकतात्या टाकणखार, रवींद्र टाकणखार, विजयकुमार कटारे, लक्ष्मण मस्के, गोविंद गोचडे, सुदर्शन स्वामी, पांडुरंग जाधव, बन्सी डोंगरे, नितीन डोंगरे, विश्वनाथ शिंदे, शेषराव भागवत, बाळासाहेब मोरे, प्रवीण काळे, मोहन राठोड, नितीन काळे, साहेबराव चव्हाण, अमोल राऊत, बाबा लोखंडे, माणिक राठोड, लक्ष्मण सरवदे, उत्तम पवार, बबन गुहाडे, संतोष साबळे, तय्यब शेख, अबूबकर सिद्दिकी, गेनू पवार, पी .बी . शिंदे, सुरेश सोळंके, सुमंत राऊत, श्यामसुंदर दासरे, नरसिंग भांजे, प्रभाकर पांचाळ, चंद्रकांत गायकवाड, बालाप्रसाद चव्हाण, भगवान सातपुते, राजाभाऊ आबूज, अविनाश राठोड, शशिकांत घनघाव, सिद्धार्थ ढवळे, बाजीराव काळे आदी मान्यवर उपस्थित होते . सर्वांनी महापुरुषांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला .
कार्यक्रमाचे बहरदार सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले .
अध्यक्षस्थानी राहुल टाकणखार होते, तर आभार अभिमन्यू ईबीते यांनी मानले . शेवटी सर्व उपस्थितांनी सामाजिक समता, बंधुता, स्वाभिमान व संविधानिक मूल्यांची जोपासना करण्याचा सामूहिक संकल्प व्यक्त केला .कार्यक्रमासाठी वसंत टाकणखार, प्रवीण जाधव, राजेंद्र सातपुते, गोविंद पवार, राजकुमार सोनवणे, कृष्णा हौसरमल, नितीन पुटवाड, जीवन डोंगरे, अमोल राऊत, राहुल खुणे, अतुल चाळक, शेख जमीर आदींनी परिश्रम घेतले .

# कु. स्वप्राली देशमुख यांचे एमपीएससी परीक्षेत यश

## कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेत कनिष्ठ अभियंता पदावर निवड



माजलगाव / प्रतिनिधी :
येथील कु .स्वप्नाली सुधीर देशमुख ( मोगरेकर ) यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग ( एमपीएससी ) परीक्षेत यश संपादन करत कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य ) पदावर निवड मिळवून उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे . त्यांच्या या यशामुळे परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून सर्व स्तरांतून कौतुक व्यक्त करण्यात येत आहे .
कु .स्वप्नाली देशमुख यांनी आपले माध्यमिक शिक्षण श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय येथे पूर्ण केले . त्यानंतर त्यांनी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, बीड येथून सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा शिक्षण पूर्ण केले . डिप्लोमा शिक्षणादरम्यान त्यांनी ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची छाप पाडली .

त्यांच्या उत्कृष्ट गुणवत्तेची दखल घेत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या हुशार व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलत योजनेअंतर्गत अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये १०० टक्के सवलत मिळाली . पुढे त्यांनी श्री तुळजाभवानी इंजिनिअरिंग कॉलेज, तुळजापूर येथून अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केले .

सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे घेतलेल्या परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवत त्यांची कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य ) पदावर निवड झाली आहे . कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणादायी ठरत आहेत .अत्यंत साध्या व गरीब परिस्थितीतून त्यांनी हे यश मिळवले आहे . त्यांचे वडील श्री .सुधीर देशमुख हे फ्रेम मेकर असून फोटो बनविण्याचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई सौ .शुभांगी देशमुख या कुमार ड्रेसेस या कापड दुकानात नोकरी करतात . कुटुंबाच्या मर्यादित आर्थिक परिस्थितीतही आई–वडिलांनी प्रामाणिकपणा, कष्ट आणि शिक्षणाची जिद्द यांची दिलेली शिकवण स्वप्नाली यांच्या यशामागे महत्त्वाची ठरली . त्यांचा भाऊ देखील पुणे येथे अभियांत्रिकी शिक्षण घेत असून संपूर्ण कुटुंब शिक्षणाच्या बळावर प्रगतीचा मार्ग निवडत आहे .आई–वडिलांच्या अथक परिश्रमांचा, संघर्षाचा आणि प्रामाणिक जीवनमूल्यांचा सन्मान करत कु .स्वप्नाली देशमुख यांनी आपल्या यशाचे श्रेय आई–वडिलांना दिले आहे . त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या पुढील उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत .

# कला-साहित्य भूषण: यशस्वितांची वास्तव ओळख!




लेखक
**देवेंद्र भुजबळ**
लेखक, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त संचालक
मोबाईल क्रमांक : 9869484800



समीक्षण
**नागेश सू. शेवाळकर**
साहित्यिक, चरित्र लेखक, पुणे .
मोबाईल क्रमांक :९४२३१३९०७१

श्री . देवेंद्र भुजबळ , निवृत्त माहिती संचालक महाराष्ट्र शासन यांनी लिहिलेले ' कला–साहित्य भूषण ' हे पुस्तक वाचण्याचे भाग्य लाभले . प्रतिकूल परिस्थितीतही ' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ' याप्रमाणे सतत कार्य करणाऱ्या व्यक्तींचा, त्यांच्या कार्याचा सर्वदूर परिचय व्हावा या सकारात्मक वृत्तीने तीस व्यक्तिंचा परिचय करून देण्याचे अविस्मरणीय काम श्री भुजबळ सर यांनी' कला –साहित्य भूषण ' पुस्तकाच्या माध्यमातून केले समाजासमोर आहे . देवेंद्र भुजबळ यांना हा एक ध्यास जडला आहे असं म्हटलं तर वावगं ठरू नये . कारण त्यांनी लिहिलेली भावलेली व्यक्तिमत्त्वे, गगनभरारी, प्रेरणेचे प्रवासी, अभिमानाची लेणी, समाजभूषण, आम्ही अधिकारी झालो, माध्यमभूषण ही पुस्तके त्यांच्या लेखनाची साक्ष देतात .




मनोगत लिहिताना एक प्रश्न भुजबळ सरांनी स्वत :लाच विचारला आहे, ' मी का लिहितो, माझ्या लेखनाचा वाचकांना, समाजाला काय उपयोग आहे, मुळात काही उपयोग आहे का ? ' लेखक या प्रश्नांची स्वत :च उत्तर देताना म्हणतात, 'प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ज्यांनी यश मिळविले, आणि स्वत :ला मिळालेल्या यशावर समाधान न मानता, ज्या व्यक्ती इतरांना यशस्वी करण्यासाठी झटत आहेत, त्यांच्या यश कथा, जीवनकथा आपल्या लेखणीद्वारे समाजासमोर आणणे होय . ' किती प्रामाणिक आणि सच्चा संदेश आहे हा ! भुजबळ सरांना हा ध्यास असण्यामागे दुसरीही एक इच्छा नक्कीच असणार, कारण आपण बघतो की, समाजात, हल्ली छोट्याछोट्या कारणांमुळे, थोड्याशा अपयशामुळे खचून जाणे, नैराश्य येणे ह्या गोष्टी वाढत चालल्या आहे . त्यामुळे अशा प्रेरणादायी जीवन कथांमुळे अनेक निराश व्यक्तिंना ऊर्जा मिळू शकते, आत्मविश्वास परत येऊन ते इप्सित साध्य करण्यासाठी नव्या जोमाने प्रयत्न करू शकतात .

गझलसम्राट सुरेश भट यांनी लावलेल्या गझलेच्या बीजाचे वटवृक्षात रुपांतर करण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा असलेले अमरावतीचे ज्येष्ठ गझलकार भीमराव पांचाळे यांच्या एकूण प्रवासाला भुजबळ यांनी शब्दसाजांनी फुलवले आहे . सुरेश भट यांनी पांचाळे यांना ' ग़ज़लनवाज ' देऊन सन्मानित केले आहे . गत् पन्नासहून अधिक वर्षे गझलेच्या प्रांगणात मुशाफिरी करणाऱ्या भीमराव यांच्यासाठी हा फार मोठा पुरस्कार आहे . महाराष्ट्रासह देशविदेशातील रसिकांना पांचाळे यांनी मंत्रमुग्ध केले आहे .

जयंत ओक यांचा प्रवास त्यांच्या धाडसाचे कौतुक करावे असाच आहे . दूरदर्शनवर काम करणे म्हणजे अभिमानास्पद ! परंतु ओक यांनी सतरा वर्षे नोकरी करून ती सोडून ' गप्पागोष्टी ' हा स्वतंत्र एकपात्री प्रयोग सुरू केला . अल्पावधीत त्यांच्या धाडसाने यशश्री खेचून आणली . हा प्रयोग भारतासोबत अनेक देशांमध्ये प्रचंड यशस्वी झाला . म्हणतात ना, ' कोशिश करनेवाले की हार नहीं होती हे ओक यांनी सिद्ध करून दाखवले अर्थात त्यांनी किती कष्ट घेतले हे त्यांनाच माहीत !

' खबरदार जर टाच मारुनी, जाल पुढे चिंधड्या उडवीन, राई राई एवढ्या . . . ' ह्या वीररसाच्या, स्फूर्तिदायी अशा ओळी आहेत . हे गीत न ऐकलेला माणूस शोधूनही सापडणार नाही . हे गीत ऐकताना अंगावर रोमांच उभे राहतात . परंतु काही व्यक्ती अशा असतात ज्या रुळलेल्या वाटेवरून न जाता स्वत :ची वेगळी वाट निर्माण करतात . असाच एक छंदिष्ट कलावंत म्हणजे प्रा . विसुभाऊ बापट ! या वीररसयुक्त गीताला एका शाळेत शृंगार रसाकडे वळविल्याचे पाहून बापट यांनी ही कविता योग्य आणि मूळ रसात पोहोचावी म्हणून ' ओंकार काव्य दर्शन ' शीर्षाखाली शालेय कार्यक्रम सुरू केला . गौरवास्पद बाब म्हणजे या कार्यक्रमाचे साडेबारा हजार कार्यक्रम सादर झाले आहेत हे लेखक आपुलकीने लिहितात . सोबतच विसुभाऊंचा ' कुटुंब रंगलंय काव्यात ' हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रमही लोकप्रियतेच्या शिखरावर आहे .

' आपल्या समाजात, घरात चित्रपट पाहणारा माणूस म्हणजे वाया गेलेला माणूस समजला जातो . वृत्तपत्रात चित्रपट समीक्षण लिहिणाऱ्यासही कमी लेखले जाते . . . ' असे विधान करणारे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समीक्षक, लेखक, भारतासह इतर देशात चित्रपट महोत्सवात ज्युरी म्हणून ओळखले जाणाऱ्या अशोक राणे यांनी समाजाला चित्रपट पाहण्याची एक वेगळी दृष्टी दिली . राणे यांची साहित्य क्षेत्रातही फार मोठी कामगिरी आहे . त्यांच्या जीवनातील अनेकानेक प्रसंगांचे वर्णन देवेंद्रजी यांनी छान रेखाटले आहे .

आकाश, निसर्ग, क्षितिज या गोष्टी मानवाच्या औत्सुक्याचा आहेत . दूरदर्शनच्या निर्मात्या मीना गोखले यांनी एक सुंदर संदेश दिला आहे, ' आकाश खूप मोठं आहे . तुम्ही भरारी घ्याल तितकी त्याची निळाई खोल आहे . ' मीना गोखले यांच्या कार्याची ओळख, महत्त्व भुजबळ सरांनी मोठ्या आत्मियतेने व्यक्त केले आहे . मीनाताईंचा दुसरा एक स्वानुभवयुक्त संदेश आहे, ' निर्मिती करताना ही जी ' मी ' आहे तिचा काय फायदा झाला ? तर माझा ' मी पणा ' कमी झाला . . . ' केवळ नाव प्रतिभा आहे असे नाही तर लेखनही ' प्रतिभासंपन्न ' असणाऱ्या लेखिका म्हणजे प्रतिभा सराफ ! भौतिकशास्त्राचे अध्यापन करताना तेरा पुस्तके प्रकाशित करणे ही सोपी गोष्ट नाही . पती अर्ध्यावर संसार सोडून गेल्यावर त्यांनी पुस्तकाची मैत्री केली . पतीच्या आठवणी जागृत करताना त्यांनी कथा, गझल, कादंबरी असे साहित्य प्रसवले . साहित्य त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग असे बनले ते त्यांच्या शब्दांत . . . लिहित नाही तेव्हा तेव्हा वाचत असते . वाचत नाही तेव्हा तेव्हा लिहीत असते . दु :ख अवतीभोवती असणाऱ्यांचा वरील ओळी आत्मविश्वास जागविणाऱ्या ठरतात .

गायिका, प्राध्यापिका, लेखिका, चित्रपट संगीत शोधक सोबत राजा हरिश्चंद्र अशा चित्रपटांसाठी योगदान देणाऱ्या हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ . मृदुला दाढे ! त्यांचा जीवनप्रवास लेखक भुजबळ यांनी सहजतेने उलगडला आहे .

लावणी न ऐकलेला मराठी माणूस विरळाच ! लावणी हे तमाशातील लोकप्रिय असे अंग ! भुजबळ सरांनी ह्या लोकप्रिय क्षेत्रातील रेश्मा मुसळे परितेकर या उच्चशिक्षित लावणी कलाकाराची छान माहिती समोर ठेवली आहे . विशेष म्हणजे रेश्माताई हा व्यवसाय सांभाळताना ' मराठी लावणी ' या विषयावर पी .एचडी . करीत आहेत ही कौतुकास्पद बाब आहे . त्यांनी प्रस्तुत केलेले बोल सद्य परिस्थितीत महत्त्वाचे आहे, ' सध्या लावणीला जे चित्रपट, रिॲलिटी शोज चे वळण प्राप्त झाले आहे, त्यामुळे खरी लावणी लोप पावत चालली असून लावणी जिवंत ठेवण्यासाठी आपली वैचारिकता वाढविण्याची आवश्यकता आहे . '

सिंगापूर येथे वास्तव्यास असलेल्या मोहना कारखानीस यांनी तिथे मराठी साहित्याची सेवा सुरू ठेवली आहे . त्यांचे साहित्य सिंगापूर येथील महाराष्ट्र मंडळ प्रकाशित करीत असलेल्या ' ऋतुगंध ' या द्विमासिकासोबत अनेक डिजिटल पोर्टल, दिवाळी अंक, विशेषांक, वर्तमानपत्र पुरवणी इत्यादी ठिकाणी सातत्याने प्रकाशित होत असते . सोबतच परदेशात राहणाऱ्या मुलांना मराठी संस्कृतीचे शिक्षण, मराठीची गोडी लावण्यासाठी कार्यरत आहेत . आपल्या देशातील जातपात, उच्चनीच, गरीब श्रीमंत इत्यादी भेद लवकर नष्ट व्हावेत हा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे . ' चांगले ते स्वीकारावे, वाईट ते सोडून द्यावे आणि सतत कार्यमग्न रहावे . ' ही त्यांची विचारसरणी अनुकरणीय आहे .

शाहीर वैराळकर, गायिका विजयालक्ष्मी मणेरीकर, परदेशस्थ चित्रकार शिल्पा तगलपल्लेवार, गझल गायक सुरेश दंडे, चित्रकार माधवी पाटील, चित्रकार विजयराज बोधनकर, लेखक डॉ .आलोक जत्राटकर, नाट्यकर्मी डॉ . श्याम शिंदे, लेखिका उषा रामवाणी, चित्रकार प्रतिभा रावळ, साहित्यिक–संशोधक धर्मपाल कांबळे, कलाकार कुटुंब रझाक–वृशाली आणि रायमा, चित्रकार रमेश औंधकर, दूरदर्शन निर्माते रविराज गंधे या मान्यवरांचा प्रवासही लेखक देवेंद्र भुजबळ यांनी अत्यंत आपलेपणाने नि शब्दसाजांनी साकारला आहे .

अमेरिकेत वास्तव्य असणाऱ्या कवयित्री डॉ . गौरी जोशी कंसारा यांचा कवितेचे रसग्रहण हा आवडता साहित्य प्रकार ! कवी बा .भ . बोरकरांच्या काव्याबद्दल त्या लिहितात, 'बोरकर यांची ' लावण्य रेखा ' ही कविता कर्मयोगाचे श्रीकृष्णाने सांगितलेले तत्त्वज्ञान अतिशय सौंदर्यपूर्ण शब्दांत समजावणारी अशी मला वाटते . '

जगप्रसिद्ध चार्ली चॅप्लिन या कलाकाराची भारतीय प्रतिकृती म्हणजे वरप्रभ शिरगावकर ! चॅप्लिनसारखी हुबेहुब वेशभूषा, केशभूषा करून महाराष्ट्रभर मनोरंजनातून प्रबोधन करणाऱ्या शिरगावकर यांच्या कार्याची योग्य शब्दांमध्ये लेखकाने दखल घेतली आहे . भारूड ह्या लोककलेचा प्रसार नि प्रचार करणारा लोकप्रिय कलाकार म्हणजे हमीद सय्यद ! कविता, देशभक्तीपर गाणी, अभंग, गौळणी, लोकगीते, कथा, कीर्तने ऐकण्याची आवड सय्यद यांना लहानपणापासूनच होती . वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमात आपली कला सादर केली . नंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही . महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये त्यांनी कला सादर केली आहे . काही नावे हीच त्या व्यक्तिची ओळख असते . अन्य विशेषणे, कौतुक याची फारशी आवश्यकता नसते . सुप्रभात, आरसा, हसवाहसवी, हास्यपंचमी, हास्यरंग, खळखळाट, विडंबन गीते, इत्यादी कार्यक्रमांसोबत विनोद, किस्से, विडंबने सादर करून घराघरात पोहोचलेली व्यक्ती म्हणजे बंडा जोशी ! अशा चौफेर व्यक्तिमत्त्वाची ओळख भुजबळ सरांनी अत्यंत आत्मीयतेने करून दिली आहे .

चित्रेकलेच्या प्रांतात ' वारली ' हा प्रकार स्वत :चे आगळेवेगळे स्थान टिकवून आहे . या क्षेत्रातील एक सुप्रसिद्ध नाव म्हणजे मधूकर वाडू ! ह्या वैशिष्ट्य प्रकारासोबत वाडू लेखन क्षेत्रातही अग्रेसर आहेत . वारली प्रकारातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन श्री देवेंद्रजी यांनी त्यांचा योग्य सन्मान केला आहे .
जाता–जाता . . . अस्मादिकाच्या कार्याचा उत्तम आढावा भुजबळ सरांनी घेतल्यामुळे आगामी कार्यासाठी प्रेरणा मिळाली आहे .

कला–साहित्य भूषण ह्या पुस्तकातील सर्वच मान्यवरांचा प्रवास भुषणावह, अलौकिक, वाचनीय नि अनुकरणीय, प्रेरणादायी आहे .

oooo

● **कला-साहित्य भूषण** : व्यक्तिचित्रण
**लेखक** : देवेंद्र भुजबळ {९८६९४८४८००}
● **प्रकाशिका** :सौ .अलका भुजबळ, न्यूज स्टोरी प्रकाशन नवी मुंबई .
● **आस्वाद** : नागेश शेवाळकर, पुणे मो . ९४२३१३९०७१

# अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हर्षलने सीए पदाला घातली गवसणी..

**➤ आष्टी / प्रतिनिधी :** दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दिवस दु :खात गेले, हिशोब करतो आहे आता किती राहिलेत डोईवर उन्हाळे, शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली, भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बर्बाद झाली . . . .या ओळी आहे कवी नारायण सुर्वे यांच्या "भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बर्बाद झाली . सारी हयात पोटाची खळगी भागवण्यासाठी केली जाणारी धडपड या कवीनी अतियश समर्थपणे शब्दात मांडली आहे . सुख दु :खाची माळ गुंफूण हसत रडत केला जाणारा हिशोबाच्या ताळेबंद लावता लावता आयुष्य अलगद निसटून जाते .तारीखाचा घोळ संपला की परत एका नववर्षाची सुरूवात होते . यंदाचा या वर्ष सुध्दा स्वप्नपूर्तीसाठी हिशोबाची ताळमेळ करून, सुख दु :खाचा ऋतू संगे नामे जिंदगीची गाडी पुढे ढकलली गेली .नव्या दिशेने, नव्या उमेदीने, नव्या जोमाने पावलाची परिक्रमाकरून निरंतर चालत राहावे मध्येच जरा क्षणभर विसावा घेवून आपल्याच अवतीभोवती असलेल्या मी पणाच वलय झटकून आपल्या माणसाचा भावबंधात जरा थबकून जातो .आयुष्य हे असच असत . मनासारख जगण्यासाठी एक वेगळीच तपस्या करावी लागते, ती तपस्या आज पूर्ण करण्यात हर्षल यशस्वी झाला .

आष्टी तालुक्यात सतत पडणाऱ्या दुष्काळी भागातील गहूखेल सारख्या अति दुर्गम डोंगराळ भागात शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले ज्ञानदेव म्हस्के यांची घरची परिस्थिती तशी हलाखीचीच . . पहाडपट्टी सारख्या ग्रामीण भागात कुटुंबाला अगदी जेमतेम शेती असल्याने उदरनिर्वाहासाठी अडचणी येत होत्या .परंतु आहे त्या परिस्थितीत दहावी नंतर कौशल्य विकास आणि उद्योजक ( ITI ) अंतर्गत व्यावसायिक व विविध तांत्रिक आणि गैर– तांत्रिक ट्रेडमध्ये इलेक्ट्रिशियन शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात शहर गाठून पुणे, हैद्राबाद याठिकाणी काम केले . सध्या ते सुपा येथे खाजगी कंपनीत इलेक्ट्रिशयन म्हणून काम करत आहेत त्यांना दोन मुलं असून एक शिक्षण घेत आहे तर दुसऱ्या मुलगा हर्षल . . . हर्षलने मात्र आई वडिलांच्या कष्टाचे चीज केले व त्यांच्या स्वप्नाला मोठी उभारी दिली . अतिशय प्रतिकूल परिस्थितीत पुण्यासारख्या महागड्या ठिकाणी मालानी, सोमानी, चांडक असोसिएट डेक्कन पुणे येथे त्याची आर्टिकल शिप झालेली आहे परंतु अजूनही एक महिना बाकी असताना त्याने अगोदरच परीक्षा दिल्याने उत्तीर्ण होऊन त्याचा



रिझल्ट लागलेला आहे आणि त्याला अडीच वर्षानंतर फायनल देता येते त्यामुळे त्यांनी खूप अभ्यास करून फायनल दिली आणि पहिल्याच प्रयत्नात पास झाला आहे अभ्यासात सतत सातत्य ठेऊन कठोर परिश्रम व आत्मविश्वासाच्या बळावर शिक्षण घेऊन चार्टर्ड अकाउंटंटच्या ( सीए ) परीक्षा पास झाला आहे .शिक्षणामुळे जीवनात क्रांती घडते, परिस्थिती कितीही बिकट आणि हलाखीची असली तरी शिक्षणातून आर्थिक क्रांती घडविता येते, असे बाळकडू वडिलांनीच त्याला दिले होते याची प्रचिती त्याने आपल्या कृतिशील कार्यातून दाखवून दिली आहे .

## शिवणकाम करून हातभार...

हर्षलच्या आईने शिवणकाम करून आपल्या वडिलांच्या मेहनतीला साथ दिली, वडिलांनीही मेहनतीचे व कठीण काम करत त्यांनी या कंपणीला आपली लक्ष्मी समजून अखंडपणे काम करून प्रसंगी वोअर टाईम करून संसाराचा गाडा

> शिक्षणामुळे जीवनात आमूलाग्र बदल होतो . वडिलांनी प्रतिकूल परिस्थितीतून आम्हाला शिक्षणासाठी सतत पाठीशी खंबीरपणे उभे राहिले . त्याची जाणीव ठेवून शिक्षणातून वैभव निर्माण करण्याचा प्रयत्न मी केला आहे . आई–वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येक पाल्याने जाणीव ठेवली तर जीवनात कोणत्याच बाबींची कमतरता भासणार नाही .
> **— हर्षल म्हस्के, सीए.**

हाकत आपले काम सुरू ठेवले .उदरनिर्वाहा साठी जेमतेम उत्पन्न मिळत असे, पण मुलांच्या शिक्षणाची चिंता मात्र सतत टोचत होती म्हणून ज्ञानदेव यांच्या पत्नी यांनीही कुटुंबाला हातभार लागावा म्हणून रात्रंदिवस शिवणकाम करून मुलांना उच्चशिक्षित करण्याचा निर्णय घेतला आणि दोन्ही मुलांपैकी एक वडिलांच्या मेहनतीचे चीज करण्यासाठी कठोर परिश्रम घेऊन शिक्षणात भरारी घेत आहे तर दुसरा चार्टर्ड अकाउंट सारखी कठीण परीक्षा देऊन यशाचा शिखरावर पोहचला आहे .

## कोरोनासारख्या महामारीशी दोन हात....

कोरोनाने ज्ञानदेव म्हस्के यांना घेरले होते, दवाखान्यात मोठया प्रमाणात खर्च करावा लागला, आर्थिक व मानसिक संकट कोसळले . उत्पन्नाचे स्रोत ठप्प आणि आरोग्याची भीती अशा दुहेरी संकटांना सामोरे जात असतानाही एका जिद्दी वडिलांनी हार न मानता परिस्थितीशी दोन हात केले पण मुलाच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही . "परिस्थिती कितीही कठीण असली तरी मुलांचे शिक्षण थांबता कामा नये, " असा ठाम विश्वास त्यांनी जपला .दिवस– रात्र मेहनत करून त्यांनी केवळ कुटुंबाचा सांभाळच केला नाही, तर मुलाला अभ्यासासाठी आवश्यक वातावरणही उपलब्ध करून दिले .हर्षल ने पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण सावेडी येथे घेतले .उच्च माध्यमिक शिक्षण ११ व १२ वी अहिल्यानगर येथे रेसिडेंशील घेऊन बी . कॉम .ची पदवी न्यू आर्ट अँड कॉमर्स येथून पूर्ण केले, त्यानंतर सी .ए .ची परीक्षा उत्तीर्ण झाला .

# शिवरायांनी जनतेच्या मनात राष्ट्रसेवा, चारित्र्य आणि स्वाभिमान पेरला - भाग्यश्री मोहिते

माजलगाव : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास नवतरुणांना प्रेरणादायी असून, समाजाला त्यांच्या विचारांची झालर गरजेची आहे . महाराजांनी जनतेच्या मनात राष्ट्रसेवा, चारित्र्य आणि स्वाभिमानाचे महत्त्व पेरल्याचे मत व्याख्याते भाग्यश्री मोहिते यांनी बोलताना व्यक्त केले . तालुक्यातील सिमरी पारगाव येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती आयोजित काल शनिवारी शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला . यावेळी मोहिते यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला . उपस्थित नागरिकांनी व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला .

सकाळी ठीक ७ वाजता पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या थाटामाटात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते . ढोल–ताशांच्या गजरात, भगव्या ध्वजांच्या साक्षीने निघालेल्या या पालखी सोहळ्याने संपूर्ण गाव शिवमय झाले



होते . ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद घेतला . पालखी सोहळ्यानंतर सकाळी ९ वाजता भाग्यश्री मोहिते यांचे प्रेरणादायी व्याख्यान संपन्न झाले . दिवसभर गावामध्ये शिवजन्मोत्सवाचा उत्साह पाहायला मिळाला . रांगोळ्या, सजावट, भगवे झेंडे आणि घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला होता . सायं सहा वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शिवजन्मोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या जल्लोषात पार पडले . या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गट अधिकारी, माजलगाव तसेच इतर मान्यवर शिक्षक उपस्थित होते . तसेच गावातील तंटामुक्ती अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनीही प्रमुख पाहुण्यांची भूमिका बजावली . मान्यवरांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे सादरीकरण आणि विविध उपक्रमांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली . संपूर्ण कार्यक्रम शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला .

सांज दैनिक बीड वास्तव
सायं . दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी . बीड –४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले . **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट , निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** ( या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद–विवाद बीड न्याय कक्षेत ) मो . 9022952922

विशेष



## इंग्रजी आकलन मुख्य परीक्षेत साक्षी भोजने हिचे घवघवीत यश

### स्माईल एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट असोसिएशन आयोजित परीक्षेत शाळेचा मान उंचावला

पाचोड / प्रतिनिधी :
स्माईल एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट असोसिएशन यांच्या वतीने आयोजित इंग्रजी आकलन मुख्य परीक्षेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोळी बोडखा (पाचोड केंद्र) येथील विद्यार्थिनी कु. साक्षी सर्जेराव भोजने हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणाऱ्या इंग्रजी आकलन कौशल्यांवर आधारित या परीक्षेत साक्षीने उत्कृष्ट कामगिरी नोंदवत शाळेचा मान उंचावला. तिच्या या यशाबद्दल तिला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती, पाचोड केंद्राचे केंद्रप्रमुख तसेच गावकऱ्यांचे मार्गदर्शन, सहकार्य व सातत्यपूर्ण प्रोत्साहन मोलाचे ठरले असल्याचे सांगण्यात आले.
या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आत्मविश्वास व प्रेरणा निर्माण झाली आहे. कु. साक्षी भोजने हिचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

**मुद्दे :**
● इंग्रजी आकलन कौशल्यांवर आधारित मुख्य परीक्षा
● जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोळी बोडखा (पाचोड केंद्र) येथील विद्यार्थिनीचे यश ● सन्मानचिन्ह व प्रमाणपत्राने गौरव
● शिक्षक, शालेय समिती व ग्रामस्थांचे मार्गदर्शन मोलाचे

## श्री क्षेत्र पावनधाम संस्थानात भक्तिरसाची उधळण


### संत तुकाराम महाराज बीजनिमित्त सप्ताहात अकराव्या वंशजांचे कीर्तन



केज : प्रतिनिधी
श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीजनिमित्त आयोजित सप्ताहाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज विविध महाराजांची कीर्तने, अभंगगायन व प्रवचने भक्तिभावाने पार पडत आहेत.

सप्ताहातील कीर्तनमालेतील चौथे पुष्प म्हणून संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज पुंडलिक महाराज देहुकर यांचे ओजस्वी कीर्तन संपन्न झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले, "श्री क्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान हे देहूकरांचे माहेरघर आहे. संत तुकाराम महाराजांच्या नामाचा गजर अखंड सुरू राहणे हीच खरी सेवा आहे."
ते पुढे म्हणाले, "संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून समाजाला भक्ती, सदाचार आणि समतेचा संदेश मिळतो. ही परंपरा जपणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. संत तुकोबाराय पावनधाम संस्थान हे कार्य अत्यंत निष्ठेने करत आहे, हे अत्यंत अभिमानास्पद आहे." या कीर्तनामुळे पावनधाम परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. सप्ताह सोहळा भाविकांसाठी आध्यात्मिक उर्जेचा अनमोल ठेवा ठरत आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण व बाललैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीस नियमित जामीन मंजूर



ॲड. अर्जुन शिंदे

माजलगांव / प्रतिनिधी :
माजलगांव शहरातील अल्पवयीन मुलीस आरोपी ओमकार दहिभाते याने अपहरण करून नेऊन अत्याचार केला या या प्रकारचा माजलगांव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी आरोपी व पीडितेस आळंदी रोड तालुका खेड जिल्हा पुणे येथून ताब्यात घेतले, आरोपीस माननीय अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय माजलगांव यांच्या समक्ष हजर केले असता माननीय न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनवली होती. आरोपीने ॲड.अर्जुन शिंदे यांच्यामार्फत मा.न्यायालयात जामीन अर्ज दाखल करण्यात आला व ॲड. अर्जुन शिंदे यांनी मा. न्यायालयात योग्य ते युक्तिवाद करून मा. न्यायालयाने आरोपीचा जामीन योग्य त्या अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आला. याप्रकरणी ॲड. अर्जुन शिंदे यांना विशेष सहकार्य ॲड. वैभव सोळंके व ॲड.चेतन सातपुते यांनी केले.

## दौलावडगाव येथील आगप्रकरणी...

● पान १ वरून... आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या प्रसंगी रामदास मोहिते, सतीश सातपुते, आमोल वाघमारे, आमोल मोहिते, साईराज पाखरे, विजय गायकवाड, दिपक कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.
**मुख्य मुद्दे :** ● दौलावडगाव येथे गाडे महाराज यांच्या घराला मध्यरात्री आग लावण्याची घटना ● घरातील अन्नधान्य, कपडे, दागिने व संसारोपयोगी साहित्य जळून खाक ● सुमारे २० ते २५ लाख रुपयांचे नुकसान
● राष्ट्रीय चर्मकार महासंघाकडून ३० हजार रुपयांची आर्थिक मदत
– चार दिवसांत आरोपींना अटक न झाल्यास आंदोलनाचा इशारा
दौलावडगाव (ता. आष्टी, जि. बीड) येथे गाडे महाराज यांच्या घराला आग लावून करण्यात आलेल्या घटनेनंतर राष्ट्रीय चर्मकार महासंघाने आर्थिक मदत करून प्रशासनाकडे आरोपींच्या तात्काळ अटकेची मागणी केली.

# ऊस जळीत प्रकरणात शेतकरी महिलेला न्याय; विद्युत वितरण कंपनी जबाबदार ठरली

## ऊस जळीत प्रकरणी चार लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचा न्यायालयाचा आदेश

### ➤ विद्युत वितरण कंपनीच्या निष्काळजीपणावर न्यायालयाचा ठपका; ६ टक्के व्याजासह रक्कम देण्याचे निर्देश



ॲड. नारायण गोले पाटील

➤ अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी
तालुक्यातील मोठेवाडी येथील शेतकरी चंद्रभागाबाई वसंतराव रणखांब यांच्या शेतातील ऊस जळीत प्रकरणी न्यायालयाने चार लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला आहे. संबंधित रक्कम ६ टक्के वार्षिक व्याजासह अदा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

एप्रिल २०१५ मध्ये रणखांब यांच्या गट क्रमांक २५७ मधील १ हेक्टर ४० आर क्षेत्रावरील ऊस पीक व ठिबक सिंचन व्यवस्था शेजारील गट क्रमांक २५८ मधील डीपीतील फ्युज तारेच्या स्पार्किंगमुळे लागलेल्या आगीत जळून खाक झाली होती. या घटनेनंतर तलाठी यांनी पंचनामा केला होता. तसेच विद्युत निरीक्षकांनी प्रत्यक्ष पाहणी करून सादर केलेल्या अहवालात विद्युत वितरण यंत्रणेतील बिघाडामुळे आग लागल्याचे नमूद करत कंपनीला जबाबदार धरले होते.

घटनेनंतर रणखांब यांनी संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा केला. मात्र नुकसानभरपाई न मिळाल्याने त्यांनी ॲड. नारायण गोले पाटील यांच्या मार्फत कायदेशीर नोटीस पाठवली. त्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्याने दिवाणी न्यायालयात चार लाख रुपयांच्या नुकसानभरपाईसाठी दावा दाखल करण्यात आला.

प्रकरणाच्या सुनावणीत फिर्यादी पक्षाने साक्षीदारांसह पुरावे सादर केले.

प्रतिवादी पक्षानेही आपले म्हणणे नोंदवले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने उपलब्ध पुराव्यांच्या आधारे विद्युत वितरण कंपनीला जबाबदार धरले.

दुसरे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांनी २४ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निकालात फिर्यादीस चार लाख रुपये व ६ टक्के व्याजासह रक्कम अदा करण्याचा आदेश दिला. या निर्णयामुळे संबंधित शेतकरी कुटुंबात समाधान व्यक्त करण्यात आले असून, निष्काळजी कारभारावर न्यायालयाने स्पष्ट भूमिका घेतल्याची चर्चा आहे.

**मुद्दे**
● एप्रिल २०१५ मध्ये मोठेवाडी येथे ऊस जळीत घटना ● डीपीतील फ्युज तारेच्या स्पार्किंगमुळे आग लागल्याचा निष्कर्ष ● विद्युत निरीक्षकांच्या अहवालात कंपनी जबाबदार ● नुकसानभरपाई न दिल्याने न्यायालयात दावा ● दिवाणी न्यायालयाचा चार लाख रुपये व ६% व्याजाचा आदेश

## आठवडी बाजारातील लूटप्रकरणी सिरसाळा पोलिसांची कारवाई; सराईत चोरटा अटकेत

### वृद्ध महिलेचे दागिने लंपास केल्यानंतर आरोपीची बाजारपेठेतून धिंड; कायद्याचा धाक दाखवण्याचा प्रयत्न



➤ सिरसाळा : पांडुरंग काळे
सिरसाळा येथील आठवडी बाजारात वृद्ध महिलेचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या सराईत चोरट्याला पोलिसांनी अटक केली आहे. अटकेनंतर आरोपीची बाजारपेठेतून धिंड काढण्यात आली.

४ फेब्रुवारी २०२६ रोजी आठवडी बाजारात मोठी गर्दी असताना एका ७० वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम अज्ञात व्यक्तीने चोरून नेली होती. घटनेनंतर परिसरात अस्वस्थता निर्माण झाली होती. दरम्यान, संबंधित आरोपी पुन्हा बाजार परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे सिरसाळा पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी गोरखनाथ दहिफळे यांनी पथकासह बाजार परिसरात सापळा रचला. संशयास्पद हालचाली दिसताच आरोपीला ताब्यात घेण्यात आले. कायद्याचा धाक निर्माण व्हावा आणि भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा या उद्देशाने आरोपीची पोलीस स्टेशन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक आणि पुढे ईदगाह चौक या मार्गावरून धिंड काढण्यात आली. या कारवाईची बाजारपेठेत चर्चा झाली. अलीकडील चोरीच्या घटनांमुळे नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये चिंता होती. पोलिसांच्या तत्पर कारवाईनंतर समाधान व्यक्त करण्यात येत आहे. पुढील तपास सुरू आहे.

**ठळक बाबी :** ● ४ फेब्रुवारी २०२६ रोजी आठवडी बाजारात ७० वर्षीय महिलेची लूट ● गर्दीचा फायदा घेत सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी ● गोपनीय माहितीनंतर पोलिसांनी सापळा रचून आरोपीला अटक ● सार्वजनिक ठिकाणी धिंड काढून इशारा





## स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

### ➤ विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रयोगांचे उत्कृष्ट सादरीकरण केले

➤ विहामांडवा/ प्रतिनिधी :
पैठण तालुक्यातील आवडे उंचेगाव येथील राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान दिन अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संपूर्ण शाळा परिसरात विज्ञानाबद्दलची जिज्ञासा आणि उत्सुकता पाहायला मिळाली.
कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अकोलकर यांच्या हस्ते थोर शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

यानंतर विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रयोगांचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. विद्याथ्यर्थ्यांनी प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून वैज्ञानिक संकल्पना सोप्या आणि रोचक पद्धतीने स्पष्ट केल्या. उपस्थितांनी या सादरीकरणाचे कौतुक केले
आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता प्रयोगातून विज्ञान शिकावे हाच या प्रदर्शनाचा उद्देश आहे. तसेच या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास निश्चितच मदत होणार आहे, असे मत शाळेचे सचिव सचिन पाचपुते यांनी व्यक्त केले. तसेच वाय. आर. माने यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन श्रीहरी गायकवाड यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षिका करीमा पटेल, यास्मिन शेख, योगिता गाडेकर, रेश्मा पठाण, लक्ष्मी जाधव, आणि तन्वीर पठाण, शिवानी औटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दुबईत अडकलेले पिंपरीचे सरपंच अशोक पवार सुरक्षित; विमानसेवा सुरू होताच परतणार





अशोक पवार, सरपंच पिंपरी

➤ आष्टी : प्रतिनिधी :
तालुक्यातील पिंपरी गावचे सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोक मोहनराव पवार हे सध्या दुबई येथे सुरक्षित असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल सपकाळ यांनी दिली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे विमानसेवा तात्पुरती विस्कळीत झाली असून त्यामुळे त्यांचा परतीचा प्रवास लांबणीवर पडला आहे.

अशोक पवार हे २२ फेब्रुवारी रोजी दुबईस्थित एक्स्पोर्ट–इम्पोर्ट व्यावसायिक विनोद औटे यांच्या निमंत्रणावरून दुबईला गेले होते. दरम्यान, अचानक उद्भवलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे काही काळासाठी आंतरराष्ट्रीय उड्डाणे स्थगित करण्यात आली. सध्या ते दुबईतील वेस्कॉट हॉटेलमध्ये सुरक्षित वास्तव्यास असून सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले.
या पार्श्वभूमीवर आमदार Suresh Dhas यांनी दूरध्वनीद्वारे अशोक पवार यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची खात्री केली. कुटुंबीयही सातत्याने संपर्कात असल्याची माहिती देण्यात आली आहे. अशोक पवार यांनी पाठविलेल्या संदेशात, "मी पूर्णपणे सुरक्षित आहे. हॉटेलमध्ये सर्व सुविधा उपलब्ध आहेत. विमानसेवा पूर्ववत होताच भारतात परत येईन. ग्रामस्थांनी कोणतीही चिंता करू नये," असे म्हटले आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधण्यात आला असून संबंधित माहिती केंद्र शासनाकडे पाठविण्यात आली आहे.
पुढील एक–दोन दिवसांत विमानसेवा सुरू झाल्यानंतर ते भारतात परततील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**मुख्य मुद्दे :**
● पिंपरीचे सरपंच अशोक मोहनराव पवार सध्या दुबई येथे सुरक्षित.
● आंतरराष्ट्रीय तणावामुळे विमानसेवा तात्पुरती विस्कळीत.
● ते दुबईतील वेस्कॉट हॉटेलमध्ये वास्तव्यास. ● आमदार सुरेश धस यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला.
● कुटुंबीय व प्रशासनाशी सातत्याने संपर्क.
● विमानसेवा सुरू होताच भारतात परतण्याची माहिती.

## उच्च शिक्षित मातंग कुटुंबियांचा बौद्ध पद्धतीने बीडच्या आष्टीत शेकडोच्या उपस्थितीत आदर्श विवाह संपन्न!



➤ आष्टी : आष्टी येथे पवार आणि साठे परिवारातील वधू–वरांचा विवाह सोहळा बौद्ध धम्म विधीनुसार अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न झाला. बीड जिल्ह्यातील ता.पाटोदा येथील शिवाजी साठे यांच्या कुटुंबातील द्वारिका शुंभागी यांचा विवाह मौजे भाळवणी (ता. आष्टी) येथील श्रीरंग पवार यांच्या कुटुंबातील द्वारक विशाल या उच्च शिक्षित वधुवरांचा सर्व बहुजन समाजाने आदर्श घ्यावा असा भगवान बुद्ध, शिव, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ या महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करुन, सर्वप्रथम उपस्थित सर्व शेकडो बंधु, भगिनी, वंदनीय भन्ते, बौद्धाचार्य यांनी सामूहिक संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करुन, बालकांनी महापुरुषाचीसुंदर वेशभूषा परिधान करत व तसेच ५०० प्रति डॉ.बाबासाहेबांचे जातीव्यवस्थेचे निर्मूलन वे पुस्तक आणि काही संविधानाच्या प्रतीचे आलेल्या पाहुण्यांना वाटप करुन बौद्ध पद्धतीने हा शाही आदर्श मंगल परिणय (विवाह) संपन्न झाला या फडणवीस सोहळ्याला चैत्यभूमी, मुंबई येथील भदंत सुमेध बोधी ए. तसेच त्यांचे शिष्य अमरावती येथील भंते आनंद यांनी पारंपरिक बौद्ध धम्म विधीनुसार विवाह संपन्न करून घेतला. बुद्ध व धम्माच्या साक्षीने, पंचशील व त्रिशरण ग्रहण करत समता, करुणा व मानवतेच्या मूल्यांवर आधारित हा मंगल परिणय साजरा करण्यात आला. या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक डी. एस. नरसिंगे, धम्म चळवळीतील कार्यकर्ते प्रबुद्ध साठे, समता सैनिक दलाचे राज्य सचिव अमरसिंह ढाका, लक्ष्मीकांत शिंदे, बीड जिल्हा (प) अध्यक्ष महालिंग निकाळजे, जिल्हा सरचिटणीस सिद्धार्थ जगझाप, जिल्हा बौद्ध पद्धतीने मंगल परिणय संपन्न उपाध्यक्ष (पर्यटन व प्रसार) ॲड. हणुमंत कांबळे, बीड तालुका अध्यक्ष राजेंद्र ससाणे, बीड तालुका संस्कार अध्यक्ष प्रा. गौतम खेमाडे, सेवानिवृत्त ए.पी.आय. भास्कर कांबळे, प्रा. साठे, बाबूराव गालफाडे, समता सैनिक रत्नाकर निकाळजे, अशोकराव निकाळजे, किशोर निकाळजे तसेच ता. आष्टी येथील भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, सदस्य व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, भारतभूमी ही भगवान बुद्धांची भूमी असून अडीच हजार वर्षांपूर्वी संपूर्ण भारतात बौद्ध धम्माची समतेची परंपरा नांदत होती. बौद्ध धम्मात सामाजिक असमानता, विषमता व शोषणाला थारा नव्हता. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन करून समाजाला समतेचा, स्वाभिमानाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला. आज अनेक कुटुंबे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन बौद्ध पद्धतीने विवाह सोहळे संपन्न करत आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ➤ माजलगाव तालुक्यात एआय आधारित हवामान केंद्राची उभारणी

## माजलगाव तालुक्यात एआय तंत्रज्ञानावर आधारित ऊस शेतीसाठी पहिले हवामान केंद्र



➤ माजलगाव : प्रतिनिधी
मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी मौजे गंगामसला व तेलगाव खुर्द येथे माजलगाव तालुक्यातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) तंत्रज्ञानावर आधारित हवामान केंद्र (वेदर स्टेशन) उभारण्यात आले. ऊस शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत शेतजमिनीत सेन्सर बसविण्याची प्रक्रिया देखील पूर्ण करण्यात आली.
हा उपक्रम KVK Baramati, VSI Pune, Fasal Pvt. Ltd. आणि NSL Sugar Ltd. (युनिट ३, जय महेश, पवारवाडी) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.
या तंत्रज्ञानामुळे स्थानिक पातळीवरील तापमान, आर्द्रता, पावसाचे प्रमाण, मातीतील आर्द्रता आदी घटकांचे अचूक मोजमाप होणार असून त्याआधारे ऊस पिकासाठी पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन आणि रोगनियंत्रण अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. एआय आधारित प्रणालीमुळे शेतकऱ्यांना मोबाईलद्वारे तात्काळ सल्ला व सूचना उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले.
यावेळी फसल कंपनीचे तंत्रज्ञ श्री. अभिषेक मुंडे, एनएसएल शुगरचे जी.एम. श्री. पारसनाथजी जयस्वाल, ए.जी.एम. श्री. दत्तात्रयजी आहेरकर, सहाय्यक ऊस विकास अधिकारी विष्णू मालुरे, आदित्य सोळंके, मयूर आगे तसेच गंगामसला व तेलगाव खुर्द येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळून उत्पादनवाढीस चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**ठळक बाबी :**
● माजलगाव तालुक्यात प्रथमच एआय आधारित वेदर स्टेशनची उभारणी ● गंगामसला व तेलगाव खुर्द येथे हवामान केंद्र आणि शेतजमिनीत सेन्सर बसविण्याची प्रक्रिया पूर्ण ● KVK Baramati, VSI Pune, Fasal Pvt. Ltd. व NSL Sugar Ltd. यांचा संयुक्त उपक्रम
● ऊस उत्पादन वाढ, पाणी व्यवस्थापन व रोगनियंत्रणासाठी तंत्रज्ञानाचा वापर
● विविध अधिकाऱ्यांची उपस्थिती